# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.12.2024** **वारःशनिवार**

---

1. मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग-राष्ट्रपतींचं प्रतिपादन
2. देशभरात नवीन 85 केंद्रीय विद्यालयं सुरु होणार, महाराष्ट्रातील तीन ठिकाणांचा समावेश
3. रिझर्व्ह बँकेकडून द्वैमासिक पतधोरण जाहीर; सलग अकराव्यांदा रेपो दरात बदल नाही.
4. 100 दिवसांच्या देशव्यापी क्षयरोग निर्मूलन मोहिमेला आजपासून प्रारंभ आणि
5. बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यातील पहिल्या डावात भारतीय फलंदाजी ढेपाळली.

**राष्ट्रपति-ओडीशा**

मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल ओडीशातील मयूरभंज जिल्ह्यातील उपरबेडा सरकारी उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना संबोधित करताना केलं. केवळ 'रोजगार मिळवण्यासाठी शिक्षण' हे ब्रीद न ठेवता, विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान संपादन केलं पाहिजे असं त्या पुढे म्हणाल्या. मयूरभंज जिल्ह्यातील रायरंगपूर महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींशी राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी काल संवाद साधला. देशातील मुली अधिक मेहनती आहेत आणि वेगाने प्रगती करत असून, देशाच्या प्रगतीचा त्यांच्या विकासाशी जवळचा संबंध आहे, असं त्या यावेळी म्हणाल्या.

**पंतप्रधान-बॅप्स**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बॅप्स म्हणजेच बोच्यासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामिनारायण संस्थेच्या कार्यकर सुवर्ण महोत्सव सोहळ्याला दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करतील. तर आज संध्याकाळी अहमदाबाद इथं नरेंद्र मोदी मैदानावर होणाऱ्या सुवर्ण महोत्सवी वर्षांच्या सांगतासोहळ्याला केंद्रीय मंत्री अमित शहा, गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल यांच्यासह गुजरातचे मंत्री उपस्थित राहाणार आहे. या सोहळ्यात जगभरातल्या एक लाख बॅप्स स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात येईल.

**अष्टलक्ष्मी उत्सव**

इशान्येकडील राज्यांची संस्कृती आणि कला दर्शवणाऱ्या 'अष्टलक्ष्मी' महोत्सवाचं काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते, नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे उद्घाटन करण्यात आलं. ईशान्य भारतातील आठ राज्यांचं प्रतिनिधित्व करणारा अशा प्रकारचा हा पहिलाच आणि आगळा-वेगळा उपक्रम असून, या महोत्सवाच्या माध्यमातून या भागातील संस्कृती आणि कला जगासमोर येतील तसंच जगभरातल्या गुंतवणूकदारांसाठी मोठ्या संधी उपलब्ध होतील असं मोदी आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले. हा महोत्सव तीन दिवस चालणार आहे.

**केंद्रीय विद्यालये**

केंद्रीय आर्थिक व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीनं देशभरात नागरी तसंच संरक्षण क्षेत्रांतर्गत 85 नवीन केंद्रीय विद्यालयं उघडण्यास मान्यता दिली आहे. यामध्ये महाराष्ट्रात अकोला, पुण्यातील एनडीआरएफ परिसर, सुदुंबरे आणि रत्नागिरीतील नाचणे भागात प्रत्येकी एक अशा तीन विद्यालयांचा समावेश आहे. 85 नवीन केंद्रीय विद्यालयांच्या स्थापनेसाठी एकंदर 5 हजार 872 कोटी रुपयांची, 2025-26 पासून आठ वर्षांच्या कालावधीसाठी तरतूद करण्यात आली आहे. आतापर्यंत 1256 केंद्रीय विद्यालयं कार्यरत

आहेत, यामध्ये परदेशात मॉस्को, काठमांडू आणि तेहरानमधील प्रत्येकी एका विद्यालयाचा समावेश आहे आणि साडेतेरा लाखांहून अधिक विद्यार्थी त्यामध्ये शिकत आहेत. या समितीनं नवोदय विद्यालय योजनेअंतर्गत देशभरात 28 नवोदय विद्यालयं स्थापन करण्यासही मान्यता दिली आहे. यात महाराष्ट्रातील ठाणे इथल्या विद्यालयाचा समावेश आहे.

**संसद**

लोकसभेत काल वायू प्रदूषण, अवयव प्रत्यारोपण, क्षयरोग निर्मूलन याविषयीच्या मुद्द्यांना मंत्र्यांनी लेखी उत्तरं दिली. त्यानंतर काँग्रेस पक्षाचे अमेरिकेतले अब्जाधीश गुंतवणूकदार जॉज सोरोस यांच्याशी संबंध असल्याचा आरोप भाजपानं केल्याच्या मुद्द्यावरुन लोकसभेत गदारोळ झाला. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांनी काँग्रेसचे खासदार अभिषेक मनु सिंघवी यांच्यासाठी आरक्षित आसनाखाली नोटांचं बंडल सापडल्याची माहिती दिल्यानंतर खळबळ उडाली. या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले असून अद्याप कोणीही हे पैसे आपले असल्याचा दावा केलेला नाही असं त्यांनी सांगितलं. त्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप झाले. सभागृहाच्या कामकाजात कधीही अडथळा आणू नये असा ठराव राज्यसभेत करण्यात यावा अशी शिफारस भाजपाचे जे. पी. नड्डा यांनी केली.

**शेतकरी एमएसपी**

केंद्रसरकार, शेतकऱ्यांना येणाऱ्या उत्पादन खर्चाच्या 50 टक्क्यांहून अधिक किमान आधारभूत किंमत निश्चित करून शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करेल असं आश्वासन केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल दिलं. राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर देताना चौहान बोलत होते. शेतमालाला किफायतशीर भाव मिळावा यासाठी केंद्रसरकार कटिबद्ध असल्याचं सांगून, अर्थसंकल्पातही कृषी क्षेत्रासाठीच्या तरतुदीत, 2013-14 च्या तुलनेत आता 1 लाख 22 हजार 528 कोटी रुपयांची अभूतपूर्व वाढ केल्याचं त्यांनी नमूद केलं.

**सिरीया**

पश्चिम आशियाई देशातली सद्यस्थिती लक्षात घेता, पुढील सूचना मिळेपर्यंत भारतीय नागरिकांनी सीरियाचा प्रवास टाळण्याचा तसंच शक्य असल्यास सिरियातून बाहेर पडण्याचा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिला असून, याबाबत मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

**पतधोरण**

रिझर्व्ह बँकेनं काल आपलं द्वैमासिक पतधोरण जाहीर केलं. यात रेपो रेट साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला आहे. सलग अकराव्यांदा प्रमुख व्याज दर कायम ठेवण्याचा निर्णय रिझर्व बँकेनं घेतला आहे. यामुळे स्थायी ठेव सुविधा दर सव्वा सहा टक्के तर किरकोळ स्थायी सुविधा दर आणि बँक दर पावणे सात टक्के कायम राहणार आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी काल यासंदर्भात माध्यमांना माहिती दिली. रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी 2023 पासून रेपो दरात कोणताही बदल केलेला नाही.

**क्षयरोग निर्मूलन-नड्डा**

देशव्यापी क्षयरोग निर्मूलन अभियानाला आजपासून सुरुवात होत आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते हरयाणातील पंचकुला इथे या मोहिमेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. देशभरातील 33 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतील मिळून 3शे 47 जिल्ह्यांत पुढील 100 दिवस ही मोहिम राबवली जाणार आहे. या मोहिमेत, क्षयरोगाचे नवीन रुग्ण शोधणे, गंभीर आजारी असलेल्या क्षयरोग्यांसाठी आधुनिक उपचार, तसंच पोषक आहार देण्यावर भर देण्यात येणार आहे.

**विधानसभा अध्यक्ष**

महाराष्ट्रात, भाजपाचे ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर यांची विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे, मुख्य सचिव सुजाता सौनिक आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, नवनिर्वाचित आमदारांना शपथ घेता यावी आणि सभापती निवडीसाठी महाराष्ट्र विधानसभेचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन आजपासून मुंबईत होणार आहे.

**<u>महापरिनिर्वाण दिन</u>**

राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68 व्या महापरिनिर्वाणदिनी काल त्यांना देशभरातून अभिवादन करण्यात आलं. राष्ट्रउभारणीतलं डॉक्टर आंबेडकरांचं योगदान दर्शवणारे अनेक कार्यक्रम विविध ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यासह अन्य मान्यवरांनी डॉक्टर आंबेडकरांना आदरांजली अर्पण केली. डॉक्टर आंबेडकर सामाजिक न्यायाचा दीपस्तंभ होते; त्यांनी समता आणि मानवतेसाठी दिलेला लढा अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>तामिळनाडू निधी</u>**

फेंजल चक्रीवादळामुळे प्रभावित राज्यांना मदत म्हणून केंद्रीय गृह मंत्रालयानं काल राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून तामिळनाडूला एकंदर 945 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. आंतर मंत्रालयीन केंद्रीय समितीकडून मूल्यांकन अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रभावित राज्यांना अतिरिक्त आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येईल. चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी आणि मूल्यांकन करण्यासाठी केंद्रीय पथक तामिळनाडू आणि पुद्दुचरीला पाठवण्यात आलं आहे. फेंजल चक्रीवादळाचा फटका बसलेल्या नागरिकांना सर्वतोपरी सहाय्य करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमध्यमांवरील संदेशात म्हंटलं आहे.

**<u>उत्तरप्रदेश-अपघात</u>**

उत्तर प्रदेशातील कनौज जिल्ह्यातील आग्रा-लखनौ महामार्गावर काल झालेल्या अपघातात 8 जणांचा मृत्यू झाला तर, 18 जण गंभीर जखमी झाले. जखमींना सैफी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. लखनौहून दिल्लीला जाणाऱ्या बसच्या चालकाचं नियंत्रण सुटून, बस रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रॅकवर आदळल्यामुळे हा अपघात झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून, पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 2 लाख रुपये तर, जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांचं अर्थसहाय्य घोषित केलं आहे.

**<u>आशिया करंडक क्रिकेट</u>**

मुलांच्या 19 वर्षांखालील गटासाठीच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघानं अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपांत्य सामन्यात भारतानं श्रीलंकेच्या संघावर 7 गडी राखून विजय मिळवला. श्रीलंकेनं दिलेलं 174 धावांचं आव्हान भारतीय संघानं 22 षटकांतच पूर्ण केलं. वैभव सूर्यवंशीनं 36 चेंडूत 67 धावा केल्या. दुसऱ्या उपांत्य सामन्यात बांग्लादेश संघानं पाकिस्तानच्या संघावर 7 गडी राखून विजय मिळवला.

**<u>क्रिकेट</u>**

बॉर्डर गावस्कर करंडक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्याच्या पहिल्या दिवशी काल भारतानं आपल्या पहिल्या डावात 180 धावा केल्या. भारताच्या डावातल्या सर्वात जास्त 42 धावा नितीश रेड्डीनं केल्या. कर्णधार रोहित शर्मा यानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर मिशेल स्टार्कच्या गोलंदाजीचा सामना करताना भारताच्या डावाची सुरुवात अडखळतच झाली. मिशेल स्टार्कनं भारताच्या सहा फलंदाजांना बाद केलं. सामन्याचा दुसऱ्या दिवसाचा खेळ सुरू झाला असून, ऑस्ट्रेलियाच्या काल पहिल्या डावात 1 गडी बाद 86 धावा झाल्या आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**